ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २०० • गुरुवार दि.७ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## नांदेडात शस्त्रांचा मोठा साठा जप्त



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील गुरु रामदासनगर येथे एका घरावर नांदेड ग्रामीण पोलीसांनी बुधवारी रात्री छापा टाकुन ४३ लाख रुपयांचा शस्त्रांचा प्रचंड साठा जप्त केला असून या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर व पोलीस कर्मचारी हे बुधवारी रात्री कोम्बिंग ऑपरेशन अंतर्गत गस्तीवर असतांना बळीरामपूर येथे एका संशयीत इसमाला ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या जवळ एक खंजर व तलवार पोलीसांना सापडली. सदरील शस्त्रांसंदर्भात पोलीसांनी अटक केलेल्या अभिजित गिरीधर सातपुते याच्याकडे चौकशी केली असता त्याने सदरील शस्त्र गुरु रामदासनगर येथुन खरेदी केल्याचे सांगितले. पो.नि.ओमकांत चिंचोलकर व पोलीस कर्मचाऱ्यांनी गुरु रामदासनगर येथे जावून एका घरावर छापा टाकला असता एक इसम पोलीसांना बघुन पळून गेला. सदरील घरातील एका खोलीची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये पोलीसांना तलवारी, गुप्त्या, खंजर, कुकरी असे ४ हजार ७९६ शस्त्र पोलीसांना सापडले. सदरील शस्त्राचा साठा ४३ लाख ४८ हजार रुपयांचा आहे. सदरील शस्त्राचा साठा हा जसवंतसिंघ प्रकाशसिंघ सुखमणी रा.अबचलनगर,नांदेड यांचा असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात अभिजित सातपुते व जसवंतसिंघ सुखमणी यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी आज (गुरुवार) सकाळी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनला भेट देवून सदरील शस्त्रसाठा जप्त करणारे पो.नि.ओमकांत चिंचोलकर व पोलीस कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या हेलिकॉप्टरला वादळाचा तडाखा

### पायलटच्या सतर्कतेने मोठा अनर्थ टळला;सर्व प्रवाशी सुखरुप



मुंबई/प्रतिनिधी-राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कल्याण आणि मुरबाड दौऱ्यासाठी निघालेल्या शिंदे यांच्या हेलिकॉप्टरला अचानक आलेल्या वादळी हवामानाचा फटका बसला. मात्र, वैमानिकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली. या हेलिकॉप्टरमधील शिंदेंसह आठ प्रवाशी सुखरुप असल्याचे सांगण्यात आले.

राज्याचे उपमुख्यमंत्री शिंदे हे आज गुरुवार दि. ७ मे रोजी मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स येथील हेलिपॅडवरून कल्याण आणि मुरबाड दौऱ्यासाठी निघाले होते. हेलिकॉप्टरने उड्डाण घेताच काही वेळातच कल्याण परिसरात हवामानात अचानक बदल झाला. परिसरात जोरदार वादळी वारे आणि पावसाने हजेरी लावली. हवेत असतानाच हेलिकॉप्टर या वादळाच्या तडाख्यात सापडले.सोसाट्याचा वारा आणि खराब पान ४ वर

## पुढील मुख्यमंत्री सुनेत्रा पवारच-जय पवार

बारामती : बारामतीच्या राजकारणात पुन्हा एकदा पवार कुटुंबीयांच्या भविष्यातील राजकीय वाटचालीबाबत चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते जय पवार यांनी २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार याच बारामतीतून निवडणूक लढवतील आणि त्यांनी मुख्यमंत्री व्हावे, अशी आमची इच्छा असल्याचे स्पष्ट विधान केले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे.

बारामती येथे आयोजित जनता दरबारानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना जय पवार बोलत होते. बारामती विधानसभा मतदारसंघात भविष्यात कोण उमेदवार असणार, याबाबत गेल्या काही दिवसांपासून विविध चर्चा रंगल्या होत्या. स्वतः जय पवार यांनी यापूर्वी लोकांची इच्छा असेल तर मी निवडणूक लढवू शकतो, असे संकेत दिल्याने पवार विरुद्ध पवार अशी पुन्हा एकदा लढत होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.मात्र, खासदार सुप्रिया सुळे आणि युगेंद्र पवार यांनी कुटुंबात पुन्हा संघर्षाचे वातावरण निर्माण होऊ नये, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे म्हटले होते. त्यानंतर आता जय पवार यांनीच सुनेत्रा पवारांच्या उमेदवारीला स्पष्ट पाठिंबा दिल्याने राजकीय समीकरणांना वेगळे वळण मिळाले आहे.बारामतीतील वाढत्या गुन्हेगारीच्या मुद्द्यावर बोलताना जय पवार म्हणाले, बारामतीतील काही घटनांची माहिती मला मिळाली आहे. अजित पवार असताना कायद्याचा जो धाक होता, तो कायम राहिला पाहिजे. यासंदर्भात मी सुनेत्रा पवार आणि पोलिस प्रशासनाशी चर्चा केली आहे.राज्यसभेच्या संभाव्य उमेदवारीबाबत सुरू असलेल्या चर्चांवरही त्यांनी भाष्य केले. माझ्या नावाची चर्चा होत असली तरी मला कोणत्याही पदाची इच्छा नाही. मी कार्यकर्त्यांसाठी आणि जनतेच्या कामासाठी कायम मैदानात राहणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत, ही बारामतीकरांची इच्छा होती. आता सुनेत्रा पवार मोठ्या मेहनतीने काम करत आहेत. त्यामुळे २०१९ मध्ये त्या पुन्हा निवडणूक लढवतील आणि भविष्यात मुख्यमंत्रीही व्हाव्यात, अशी आमची अपेक्षा आहे, असे म्हणत जय पवार यांनी सुनेत्रा पवारांबद्दलचा विश्वास व्यक्त केला.

## माजी जिल्हाधिकाऱ्यांना ७३ कोटींच्या घोटाळ्यात अटक

### बीड भूसंपादन घोटाळ्यातील कारवाईने खळबळ

बीड:बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन आणि वाढीव मावेजा वाटपातील कोट्यवधी रुपयांच्या कथित घोटाळ्याप्रकरणी बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी तथा आयएएस अधिकारी अविनाश पाठक यांना एसआयटीने लातूर येथून अटक केली आहे. दिवसभर चौकशी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली असून, या अटकेमुळे राज्याच्या प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन प्रक्रियेदरम्यान जमिनींचे मूल्यांकन आणि शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या वाढीव मावेजामध्ये मोठ्या प्रमाणात फेरफार करून शासनाची तब्बल ७३ कोटी रुपयांहून अधिक फसवणूक झाल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे. या घोटाळ्याचा तपास विशेष तपास पथकाकडून सुरू असून, यापूर्वीच शिवाजीनगर पोलीस ठाण्यात १० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामध्ये अविनाश पाठक यांच्या नावाचाही समावेश होता.तपासात धक्कादायक बाबी समोर आल्या असून, राष्ट्रीय महामार्ग अधिनियमानुसार संपादित जमिनींना वाढीव मोबदला मिळवून देण्यासाठी बनावट आदेश तयार करण्यात आल्याचे उघड झाले आहे. विशेष म्हणजे, अविनाश पाठक यांची २२ एप्रिल २०२५ रोजी बदली झाल्यानंतरही त्यांच्या कार्यकाळातील मागील तारखा वापरून आदेश काढण्यात आले. या आदेशांवर बनावट स्वाक्षऱ्यांचा वापर करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या बनावट आदेशांच्या आधारे तब्बल १५४ प्रकरणांमध्ये २४१ कोटी ६२ लाख रुपयांचा वाढीव मोबदला मंजूर करण्यात आला. त्यापैकी अंदाजे ७३ कोटी ४ लाख रुपये संबंधित खातेदारांना वितरितही करण्यात आले असल्याचे तपासात समोर आले आहे. धक्कादायक म्हणजे, या आदेशांची कोणतीही अधिकृत नोंद, रजिस्टर अथवा नोंदवही भूसंपादन समन्वय कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचेही स्पष्ट झाले आहे. अविनाश पाठक हे २०१३ च्या तुकडीतील आयएएस अधिकारी असून पान ४ वर

## पूर,अतिवृष्टी,प्रचंड नुकसान,पंचनामे तरीही विमा नाही

### किनवट-माहूरच्या शेतकऱ्यांचा पीक विम्यावर संताप

किनवट/प्रतिनिधी-मागिल खरीप हंगामातील उमरी, बोधडी, शिवणी आणि दहेली या चार मंडळातील सर्वच पीक विमा विमाधारक शेतकऱ्यांना परतावा रक्कम मिळाली असेलच असे नाही. उर्वरित पाच मंडळातील शेतकरी सुद्धा पूर्णपणे विमा परतावा रक्कमेपासून अद्यापपर्यंतही वंचित राहिले आहेत. केंद्र ६०% आणि राज्य ४०% यांच्या निधीतील ताळमेळ लागत नसल्यामुळे हे एक विलंबाचे प्रमुख कारण असू शकते. तुर्तासतरी गणना प्रक्रियेतून पात्र विमाधारकांच्या निवडीसाठी चाळणी लावल्यामुळे किती पात्र आणि किती अपात्र हे सुद्धा स्पष्ट होईल असे सूत्रांनी सांगितले. सरसगट नव्हे तर पात्रतेचा आडवा दांडू लावल्याने परतावा रक्कमेपासून माहूर तालुक्याला बेदखल केले असून, किनवट तालुक्यातील किती शेतकरी वंचित राहातील ते पुढे पहायला मिळणार आहे.

किनवट तालुक्यातील अतिवृष्टीचे प्रमाण सर्वाधिक आहे. काही मंडळात चार वेळा तर काही मंडळात कमी अधिक प्रमाणात अतिवृष्टी झाली. महापुराच्या तांडवाने पैनगंगेसह लहान मोठ्या नदीनाल्याच्या पुरात सभोवतालची शेती पिकासह खरडली. सखल जमिनी चिबाडून पिके हातची गेली. हे कटूसत्य सरकार अमान्य करणार का?, वारंवार शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नेते आणि अधिकाऱ्यांनी पहाणी दौरे केले. कृषी व महसूल विभागाला नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या हे नाकारणार का?, अशाही परिस्थितीत शेतकऱ्यांनी पीक विमा उतरवला. नुकसानीनंतर परतावा मिळण्यासाठी क्लेम सुद्धा केले. पाठपुराव्याचे सातत्य राखले. तरीसुद्धा राज्य सरकारला वेळीच घाम आलेला नाही हे सर्वश्रुत आहे. २०२५ या खरीप हंगामाची अंतीम आणेवारी/पैसेवारी ही ३५% टक्क्यांवर आली. सर्व निकषानंतरही सरसगट शेतकरी पीक विमा परतावा रक्कमेस पात्र ठरत नसतील तर यापेक्षा दुर्दैव ते कोणते? असे म्हणण्याची वेळ आली आहे. उमरीबाजार, दहेली, बोधडी आणि शिवणी या चार मंडळात बहूतांश शेतकऱ्यांना विमा परतावा रक्कम मिळाली परंतु काहींना मिळाली नसल्याचे समजते. किनवट, मांडवी, मोहपूर, जलधारा आणि इस्लापूर या पाच मंडळातील शेतकऱ्यांना विमा परतावा रक्कम मिळालेली नाही. गणना प्रक्रियेतून पात्र ठरलेल्या विमाधारकांनांच त्याचा परतावा मिळणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. अपात्र म्हणजे ज्या शेतकऱ्यांचे नुकसानच झाले नाही आणि कशा शेतकऱ्यांनी क्लेम केला असेल असा प्रशासनाचा समज झाला असावा म्हणून गणना प्रक्रियाची चाळणी लावली हे मात्र अगदी स्पष्ट दिसते. विमा परतावा रक्कमेचा एकट्या राज्य सरकारवर बोजा पडणार नाही, ४० टक्केच राज्य शासन आणि ६० टक्के केंद्र सरकारचा वाटा असल्याने त्यांच्यातील समन्वयाला वेळ लागतोय. आता मे महिन्याचा पहिला आठवडा संपतोय. शेतकऱ्यांची खरीप पेरणीच्या बि-बियाण्याची घाई गडबड सुरू होणार आहे. विमा परतावा रक्कम आताच शेतकऱ्यांच्या हाती लागली तर कामी लागेल. नेत्यांनी प्रशासनाला दिलेल्या सूचनांचा फारसा परिणाम दिसत नाही हे विशेष नवलाव म्हणावे लागेल.

## बिहार मंत्रिमंडळाचा २२ दिवसांनी विस्तार

### नितीश कुमार यांच्या पुत्रालाही मंत्रीपद

पटना:बिहारमध्ये सम्राट चौधरी मंत्रिमंडळाचा २२ दिवसांनी विस्तार करण्यात आला. या भव्य शपथविधी सोहळ्यात मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या नेतृत्वाखाली ३२ नव्या मंत्र्यांनी शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हजेरी लावली होती. विशेष म्हणजे, माजी मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे पुत्र निशांत कुमार यांनाही प्रथमच मंत्रीपदाची संधी देण्यात आली आहे.

बिहारमध्ये माजी मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर १५ एप्रिल रोजी मुख्यमंत्री पदाची सम्राट चौधरी यांच्यासह दोन उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेतली होती. अवघ्या २२ दिवसात चौधरी यांच्या मंत्रिमंडळाचा आज विस्तार करण्यात आला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हेही उपस्थित होते. नवीन मंत्रिमंडळात भाजपचे १५, जनता दल युनायटेडचे १३, एलजेपी (रामविलास)चे २, तर एचएएम आणि आरएलएमचे प्रत्येकी एक मंत्री सहभागी झाले आहेत. शपथविधी दरम्यान निशांत कुमार, श्रवण कुमार, विजय सिन्हा, लेसी सिंग आणि दिलीप जयस्वाल यांनी एकाचवेळी शपथ घेतली. निशांत कुमार यांचे हे पान ४ वर

## आजार एकाकीपणाचा विषयावर विवेक घळसासी यांचे व्याख्यान

### अतुल लाहोटी यांना श्री रामलालजी बाहेती सेवा पुरस्कार

नांदेड/प्रतिनिधी-आधुनिक प्रगतीच्या धावपळीत माणूस नातेसंबंधांपासून दूर तर जात नाही ना, यावर चिंतन करायला भाग पाडणारे आजार एकाकीपणाचा या विषयावरील ज्येष्ठ भागवताचार्य विवेक घळसासी यांचे व्याख्यान रविवारी दि.१० मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे.याच कार्यक्रमात उद्योजक रामलाल बाहेती यांच्या नावे दिला जाणारा समाजसेवा पुरस्कार अतुल लाहोटी यांना प्रदान करण्यात येणार आहे.




केशरबाई गणेशलालजी बाहेती चॅरिटेबल ट्रस्ट, नांदेड यांच्या वतीने हा कार्यक्रम दुपारी ३.३० वाजता श्री शंकररावजी चव्हाण प्रेक्षागृह, स्टेडियमजवळ, नांदेड येथे भव्य स्वरूपात होणार आहे.यावेळी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते तसेच माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ, पुणेचे माजी अध्यक्ष अतुल श्यामसुंदर लाहोटी यांना श्री रामलालजी बाहेती समाज सेवा पुरस्कार सपत्नीक प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कारात रोख रुपये २१ हजार, मानपत्र, शाल व श्रीफळ यांचा समावेश आहे अशी माहिती आयोजकांनी दिली.या कार्यक्रमास कार्यक्रमास सर्व सुजाण नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहावे, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष निखिल बाहेती, कार्याध्यक्ष गोपाललाल लोया, सचिव प्रा. किशनप्रसाद दरक, कोषाध्यक्ष ॲड. अशोक भुतडा, उपाध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम भक्कड तसेच संचालक पान ४ वर

## वादळाच्या तडाख्यात लग्नाचा मंडप उडाला;वऱ्हाडींची धावाधाव

## माहूर परिसरात गारांसह मुसळधार पाऊस

माहूर/प्रतिनिधी-माहूर तालुक्यात गुरुवारी दुपारच्या सुमारास अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह गारांच्या पावसाने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडवली. तालुक्यातील लखमापूर येथे सुरू असलेल्या विवाह समारंभात वादळी वाऱ्याचा मोठा फटका बसला. जोरदार वाऱ्यामुळे विवाहासाठी उभारलेला मंडप उडून गेल्याने वऱ्हाडी मंडळींमध्ये एकच धावाधाव उडाल्याचे चित्र पान ४ वर



# 'बदल'ता पश्चिम बंगाल

**देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून, त्यापैकी तीन राज्यांत भारतीय जनता पक्षाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या निवडणुकांमध्ये पश्चिम बंगाल आणि केरळ या दोन राज्यांच्या प्रचाराची देशभर सर्वाधिक चर्चा झाली. या दोन्ही राज्यांचे राजकारण, सामाजिक रचना आणि वैचारिक पार्श्वभूमी वेगळी असली तरी निकालांनी भारतीय राजकारणातील बदलत्या प्रवाहांची स्पष्ट जाणीव करून दिली आहे. केरळ हे देशातील सर्वाधिक सुशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्य मानले जाते. या राज्यात अनेक दशकांपासून दर पाच वर्षांनी सत्तांतर होण्याची परंपरा होती. डावे लोकशाही आघाडी आणि काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडी यांच्यात सत्ता आलटून-पालटून येत असे. मात्र, मागील विधानसभा निवडणुकीत केरळच्या मतदारांनी ही परंपरा मोडीत काढत डाव्या आघाडीला सलग दुसऱ्यांदा सत्तेवर बसवले होते. त्यामुळे डाव्या पक्षांची केरळमधील सलग दहा वर्षांची सत्ता कायम राहिली होती.यावेळी मात्र परंपरेनुसार सत्तांतर झाले आणि डाव्या पक्षांना पराभव पत्करावा लागला. या निकालानंतर अनेक माध्यमांनी ''डाव्यांचा शेवटचा गड कोसळला'' किंवा ''देशात डाव्यांची सत्ता असलेले एकही राज्य उरले नाही'' अशा आशयाच्या बातम्या प्रसिद्ध केल्या. काही उजव्या विचारसरणीच्या राजकीय विश्लेषकांनीही डाव्यांच्या राजकारणावर टीका करताना, ''डावे सत्तेसाठी झगडतात;मात्र जनतेचा विश्वास टिकवण्यात अपयशी ठरतात,'' अशा स्वरूपाचे मतप्रदर्शन केले. प्रत्यक्षात पाहता, केरळमधील निकाल हा केवळ सत्तांतराचा भाग असला तरी त्यातून डाव्या राजकारणाच्या मर्यादा आणि बदलत्या सामाजिक अपेक्षा स्पष्ट झाल्या आहेत. दुसरीकडे, पश्चिम बंगालचे राजकारण अधिक गुंतागुंतीचे आणि संघर्षमय राहिले आहे. तब्बल बत्तीस वर्षे सत्तेत असलेल्या डाव्या आघाडीचा पराभव करून ममता बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेसला सत्तेवर आणले होते. त्या काळात भाजप बंगालमध्ये अत्यंत दुबळ्या स्थितीत होता. मात्र, गेल्या पंधरा वर्षांत ममता बॅनर्जी यांचे नेतृत्व मजबूत होत गेले तसेच राज्यातील राजकीय संघर्षही तीव्र होत गेला. तृणमूल काँग्रेस, डावे पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित कार्यकर्त्यांमध्ये सातत्याने संघर्षाचे वातावरण निर्माण होत राहिले.डाव्या पक्षांनी तृणमूल काँग्रेस आणि भाजप या दोन्ही शक्तींविरुद्ध आक्रमक भूमिका घेतली; तरीही पश्चिम बंगालमध्ये त्यांची राजकीय ताकद मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे वास्तव नाकारता येत नाही. विशेष म्हणजे, एकेकाळी बंगालमध्ये भाजपला राजकीय संधी मिळवून देण्यात तृणमूल काँग्रेसच्या राजकारणाचाही काही अंशी वाटा होता, असे अनेक राजकीय निरीक्षक मानतात. आज तीच भाजप पश्चिम बंगालच्या सत्तेवर पोहोचली आहे आणि ममता बॅनर्जी यांना सत्तेबाहेर जावे लागले आहे.ममता बॅनर्जी यांचे राजकारण अत्यंत चिवट आणि संघर्षशील मानले जाते. त्यामुळे पराभवानंतर त्यांनी तातडीने माघार घेण्याऐवजी निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भाजपला मिळालेले यश हे ''मतचोरी''मुळे मिळाल्याचा आरोप त्यांनी केला असून, राजीनामा देण्यासही त्यांनी नकार दर्शविला आहे. या भूमिकेमुळे राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निवडणूक निकालानंतर पश्चिम बंगालमध्ये पुन्हा हिंसक राजकारणाची छाया दिसू लागली आहे. तृणमूल काँग्रेसमधून भाजपमध्ये गेलेले आणि भावी मुख्यमंत्रीपदाचे दावेदार मानले जाणारे सुवेंदू अधिकारी यांच्या खाजगी सचिवावर झालेल्या गोळीबारात त्यांचा मृत्यू झाला.या घटनेमुळे बंगालमधील राजकीय संघर्ष नव्या टप्प्यावर जाण्याची भीती व्यक्त होत आहे.केरळ आणि पश्चिम बंगाल या दोन्ही राज्यांतील निकाल भारतीय राजकारणासाठी महत्त्वाचे संकेत देणारे आहेत. एका बाजूला डाव्या राजकारणाचे अस्तित्व टिकवण्यासाठी नव्या विचारांची गरज अधोरेखित होत आहे, तर दुसऱ्या बाजूला वाढत्या ध्रुवीकरणामुळे लोकशाहीसमोरील आव्हानेही स्पष्ट होत आहेत. सत्तांतर हे लोकशाहीचे लक्षण असले तरी त्यानंतर निर्माण होणारे हिंसक वातावरण कोणत्याही राज्यासाठी घातक ठरू शकते. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांनी संयम, लोकशाही मूल्ये आणि जनतेचा विश्वास या तिन्ही गोष्टी जपणे, हीच काळाची खरी गरज आहे.**

# प्राचार्य जयंवत येवतीकर सरांच्या शाब्बासकीचा स्पर्श

**राज गोडबोले**
नांदेड.

शाळा महाविद्यालयातील शिक्षक प्राध्यापक यांच्या कडून मिळालेली शाब्बासकी, वेगळाच आनंद देऊन जाते. हृदयाच्या एखाद्या कोपऱ्यात ती साठवून असते. प्रसंगांनुरूप ती आठवण जागी होते. प्राचार्य येवतीकर सरांच्या दुःखद निधनाने ती आठवण जागृत झाली. नांदेड एज्युकेशन सोसायटी चे पीपल्स हायस्कूल व पीपल्स कॉलेज नांदेड हे पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेले ही नामांकित शैक्षणिक संस्था. समाजवादी विचाराने प्रभावित असलेली या संस्थेमध्ये अनेक नामांकित प्रसिद्ध प्राध्यापक विचारवंत असणारे थोर साहित्यिक अशा मंडळींचा मोठा भरणा होता. यात डॉ.सुरेंद्र बारलिंगे डॉ.स.रा. गाडगीळ, प्राचार्य नारहर कुरुंदकर सर प्रा.दत्ता भगत सर डॉक्टर तारा परांजपे मॅडम इत्यादी नामांकित असणाऱ्या थोर विचारवंत प्राध्यापका सोबतच अनेक वैचारिक प्रगल्भ असणारे असे प्राध्यापक मंडळी होती. अशा आपल्या शिक्षकाकडून मिळालेली शाब्बासकी व आशीर्वाद मिळाल्यानंतर एक वेगळाच आनंद,हुरूप येतो. काल प्राचार्य येवतीकर सर गेल्याची दुःखद बातमी कळाली आणि त्यांच्या आठवणीं डोळ्यासमोर तरुळूण उभा राहिल्या. त्यांनी दिलेली शाब्बासकीची थाप स्पर्शून गेली.

मी पीपल्स कॉलेजचा आर्टचा विद्यार्थी १९८० ते ९० दशकाततील हा काळ म्हणजे त्या काळातील मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनातील घडामोडीचा कालखंड त्यामुळे कॉलेजमधील अनेक बंद आणि संप यामध्ये विद्यार्थ्यांचे नेतृत्व करत असताना कळत नकळत कॉलेजच्या सर्वच प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी जवळून संबंध येत होता. कॉलेजच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भिंती पत्र चालवणे, कॉलेज मॅक्झिनच्या संपादकीय मंडळात माझा सहभाग असायचा, वाद -विवाद स्पर्धेसाठी मी व विलास ढवळे व इतर मित्रांनी मिळून युथ डिबेट असोसिएशन स्थापन करून अंतर महाविद्यालयान वादविवाद स्पर्धा दरवर्षी घेत होतो. त्यामुळे ऍक्टिव्ह विद्यार्थी म्हणून माझी ओळख होती.तसेच संस्थेतील घटना घडामोडी च्या संदर्भातही मला बऱ्याच गोष्टीची माहिती होती. त्याचे कारण म्हणजे प्रा. के. जी.कावळे सर यांच्या घरच्या गच्चीवरील होणाऱ्या चर्चा यात समाजवादी, गांधीवादी, मार्क्सवादी, हिंदुत्ववादी व आंबेडकरवादी आशा चर्चेतून एक वेगळे प्रबोधन व्हायचे. प्राध्यापक कावळे सरांच्या पी.एच.डी.च्याप्रबंधासाठी सर्वे करत असताना मी त्यांच्या सोबतच असायचो.



शिक्षणा बरोबरच माझा राज टेंट हाऊस हा व्यवसाय करत होतो. पुढे नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमाचे काम माझ्याकडे आले. मोठा मंडप व या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या सर्व साहित्याची व्यवस्था करण्याचे कॉन्ट्रॅक्ट मला मिळाले. यावेळेस कॉलेजचे प्राचार्य येवतीकर सर हे होते. काम सुरू करण्याच्या आधी सरांची भेट झाली.तेव्हा त्यांनी आश्चर्याने विचारले राजू तू एवढे मोठे काम करणार ? तुझ्याकडे एवढे सामान, कामगार आहेत. समितीचे प्रमुख प्रा.डी.जे.पांडेसर होते. यांना ही प्रश्न केला पांडे सर राजू हा एवढे काम करून शकेल काय? सरांनी माझ्या कामा चे कौतुक केले. कारण त्या काळात मोठा भव्य मंडप केवळ कोल्हापूर, सोलापूर कडूनच येत होता. नांदेडमध्ये अशा मोठ्या कार्यक्रमाला माझ्याबरोबर इतर एक दोघांनी सुरुवात केली होती.हा सुवर्ण महोत्सवी कार्यक्रम अत्यंत भव्य स्वरूपात पार पडला या कार्यक्रमासाठी देशाचे गृहमंत्री माननीय शंकररावजी चव्हाण साहेब, मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख साहेब नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गोविंदभाई श्रॉफ, सदाशिवराव पाटील साहेब, डॉ. व्यंकटेश काब्दे साहेब, सुधाकररावजी डोईफोडे साहेब, डॉ.तारा परांजपे मॅडम इत्यादी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य स्वरूपात कार्यक्रम पार पडला. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर प्राचार्य येवतीकर सर यांनी मला बोलून घेतले आणि एवढ्या भव्य-दिव्य कार्यक्रमाचे नियोजन व्यवस्थित केल्या बद्दल माझे कौतुक केले आणि शाब्बासकीची थाप पाठीवर दिली. सध्याच्या परिस्थितीचा विचार करता अशी कौतुक करणारी माणसे दुर्मिळ होत चालली आहेत.आपलेपणाची, जिव्हाळ्याची,आपुलकीची दुर्मिळता वाढत असल्याचेही जाणवते.सरांच्या दुःखद निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली.

# ज्यांनी कधीही चांगले काम केले नाही,ते सत्कारास पात्र कसे?

**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

आजच्या समाजात एक विचित्र आणि चिंताजनक प्रवृत्ती वाढताना दिसते आहे. ज्या व्यक्तींनी आयुष्यात कधीही समाजासाठी काहीही विधायक कार्य केलेले नाही, ज्यांचे योगदान नगण्य किंवा शून्य आहे, त्या व्यक्तींचा मोठ्या थाटामाटात सत्कार केला जातो. हा केवळ प्रश्न नाही, तर आपल्या मूल्यव्यवस्थेच्या अधःपतनाचा गंभीर इशारा आहे. सत्कार हा शब्द मुळात सन्मान, कर्तृत्व आणि प्रामाणिक परिश्रम यांच्याशी जोडलेला आहे; परंतु आज तो केवळ दिखाऊपणा, स्वार्थ आणि खोट्या प्रतिष्ठेचा भाग बनत चालला आहे.

आजच्या कलियुगात जणू एक नवीच स्पर्धा सुरू झाली आहे कोण अधिक स्वार्थी, कोण अधिक दिखाऊ, आणि कोण अधिक लोकांना फसवू शकतो. अशा लोकांना समाजात प्रतिष्ठा मिळते, त्यांचे सत्कार होतात, आणि त्यांच्या भोवती कृत्रिम आदराचे वलय निर्माण केले जाते. ही परिस्थिती केवळ हास्यास्पद नाही, तर धोकादायक आहे. कारण यामुळे खऱ्या कर्तृत्वाला दुय्यम स्थान मिळते आणि खोट्या लोकांना बळ मिळते.अनेकदा असे दिसते की, काही व्यक्ती आपल्या वडिलोपार्जित संपत्तीवरच आयुष्य जगतात. त्यांनी स्वतः काहीच निर्माण केलेले नसते, स्वतःचे अस्तित्व सिद्ध केलेले नसते, तरीही ते समाजात मोठेपणाचा आव आणतात. ''मी जन्माला आलो आणि फक्त संपत्तीचा उपभोग घेतो'' अशी मानसिकता असलेले लोक स्वतःचे मूल्यमापन करण्याऐवजी स्वतःचीच स्तुती करत राहतात. त्यांच्या कर्तृत्वाचा पाया शून्य असतो, पण प्रसिद्धीचा डोंगर उभारण्याचा आटापिटा मात्र प्रचंड असतो.याहूनही विचित्र गोष्ट म्हणजे अशा लोकांना साथ देणारे, त्यांची स्तुती करणारे आणि त्यांना उचलून धरणारे काही तथाकथित समर्थक असतात. हे लोक स्वतःही तितकेच स्वार्थी आणि ढोंगी असतात. ते एकमेकांचे अभिनंदन करतात, एकमेकांचे सत्कार करतात आणि समाजात एक खोटे चित्र निर्माण करतात की, ''काय उत्कृष्ट कार्य केले आहे!'' प्रत्यक्षात मात्र त्या कार्याचा समाजाला काहीही उपयोग नसतो.या कार्यक्रमांना बाहेरगावचे लोक उपस्थित असतात. त्यांना त्या व्यक्तींचे खरे स्वरूप माहिती नसते. त्यामुळे ते या दिखाव्याला खरे मानतात आणि नकळत त्या खोट्या प्रतिष्ठेला बळकटी देतात. अशा प्रकारे एक खोटेपणाचा फुगा तयार होतो, जो समाजाच्या डोळ्यांवर पडदा टाकतो.




अशा व्यक्ती स्वतःच्या अंतरंगातील अंधार लपवण्यासाठी सतत बाह्य दिखावा करतात. त्यांना स्वतःच्या कमतरता, अपयश किंवा नैतिक अधःपतनाची जाणीव असते, पण ती स्वीकारण्याचे धैर्य नसते. त्यामुळे ते सतत स्वतःचे गुणगान करतात, स्वतःचा दरबार सजवतात आणि लोकांसमोर एक बनावट प्रतिमा उभी करतात.सत्कार सोहळे हे याच दिखाव्याचे प्रमुख माध्यम बनले आहेत. एक हार, एक शाल, एक नारळआणि झाले सत्कार! त्या मागे कोणतेही खरे कार्य नाही, कोणतीही सामाजिक बांधिलकी नाही, कोणतीही जबाबदारी नाही. फक्त पैसा खर्च करून, लोकांना बोलावून आणि माध्यमांमध्ये प्रसिद्धी मिळवून स्वतःला ''महान'' सिद्ध करण्याचा हा केविलवाणा प्रयत्न असतो. अनेकदा असेही दिसते की, या लोकांकडे पैसा मोठ्या प्रमाणात असतो. ते पैशाच्या जोरावर लोकांना विकत घेतातसत्कारासाठी लोक, टाळ्या वाजवण्यासाठी लोक, स्तुती करणारे लोक, अगदी रडण्यासाठीही लोक! हा प्रकार इतका भयानक आहे की, खोटेपणालाही आता व्यवसाय म्हणून स्वीकारले जात आहे. सहानुभूती मिळवण्यासाठी कृत्रिम प्रसंग निर्माण केले जातात, स्वतःला पीडित दाखवले जाते, आणि त्यातून स्वतःची प्रतिमा उंचावली जाते.



''हजारो लोकांना बुडवून स्वतःचे घर उजळवणे'' ही मानसिकता आज अनेक ठिकाणी दिसते. अशा लोकांना इतरांच्या नुकसानाची, दुःखाची किंवा विनाशाची काहीही जाणीव नसते. त्यांच्या दृष्टीने फक्त स्वतःचा फायदा महत्त्वाचा असतो. समाज, मूल्ये, नैतिकताया सगळ्या गोष्टी त्यांच्या दृष्टीने गौण असतात.यात सर्वात वेदनादायक गोष्ट म्हणजे काही माध्यमे आणि पत्रकारही या प्रवाहात वाहून जातात. सत्य मांडण्याऐवजी ते अशा लोकांची स्तुती करतात, त्यांच्या कार्यक्रमांना प्रसिद्धी देतात आणि समाजासमोर एक चुकीचा आदर्श ठेवतात. पत्रकारितेचे कर्तव्य म्हणजे सत्य उघड करणे, समाजाला योग्य दिशा देणे; पण जेव्हा तीच पत्रकारिता पैशाच्या किंवा दबावाच्या आधारे वाकते, तेव्हा समाजाचे मोठे नुकसान होते.आपण जे लिहितो, बोलतो किंवा व्यक्त करतो, ते समाज सुधारण्यासाठी असते. परंतु काही लोक ''हम नहीं सुधरेंगे'' या भूमिकेतच राहतात. त्यांना टीकेचा काहीही परिणाम होत नाही. ते आपल्या चुकीच्या मार्गावरच चालत राहतात आणि इतरांनाही त्याच मार्गावर नेतात. ही प्रवृत्ती केवळ वैयक्तिक नाही, तर सामाजिक स्तरावर घातक आहे.

आज आवश्यक आहे ती जागरूकतेची. समाजाने स्वतः विचार करायला हवाकोण खरे कार्य करते आहे आणि कोण फक्त दिखावा करतो आहे? कोण समाजासाठी झटतो आहे आणि कोण समाजाला फसवतो आहे? आपण कोणाचा सत्कार करतो आहोत आणि का करतो आहोत? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधली, तरच आपण या खोट्या प्रतिष्ठेच्या जाळ्यातून बाहेर पडू शकतो.खरा सत्कार हा केवळ हार, शाल आणि नारळ यापुरता मर्यादित नसतो. तो त्या व्यक्तीच्या कर्तृत्वाचा, प्रामाणिकतेचा आणि समाजासाठी केलेल्या योगदानाचा असतो. जो माणूस शांतपणे, निस्वार्थपणे समाजासाठी काम करतो, त्यालाच खऱ्या अर्थाने सन्मान मिळायला हवा. दिखाव्याच्या आणि पैशाच्या जोरावर मिळवलेला सन्मान हा केवळ क्षणिक असतो; पण खरे कर्तृत्व हे कायम स्मरणात राहते. समाजाने आता या बनावटपणाला ओळखले पाहिजे. खोट्या लोकांना उचलून धरण्याऐवजी खऱ्या कार्यकर्त्यांना पुढे आणले पाहिजे. अन्यथा, आपणच या अधःपतनाला जबाबदार ठरू. प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात केली, तरच बदल शक्य आहे.सत्कार हा अधिकार नसून, तो कर्तृत्वाने मिळवायचा मान आहे.जो तो मान विकत घेण्याचा प्रयत्न करतो, तो स्वतःचीच किंमत कमी करतो.


**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६
जा क्रं २०२६/जे.मृ.नो./कवी दिनांक ०७/०४/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**
**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार रफिका बेगम अब्दुल वाहेद रा गायकवाड गल्ली कंधार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या रफिका बेगम अब्दुल वाहेद रा गायकवाड गल्ली कंधार ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेंल्या चे नाव रफिका बेगम अब्दुल वाहेद रा. गायकवाड गल्ली कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक १०/११/१९६६ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ६/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६
जा क्रं २०२६/जे.मृ.नो./कवी दिनांक ०७/०४/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**
**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार मोहम्मद गौस मोहम्मद इस्माईल रा.सुलतानपुरा कंधार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या मोहम्मद गौस मोहम्मद इस्माईल रा.सुलतानपुरा कंधार ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेंल्या चे नाव मोहम्मद गौस मोहम्मद इस्माईल रा.सुलतानपुरा कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०४/०३/१९८२ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ६/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**CHANGE IN NAME**
My Old Name is RASHEED
Father name GULAM SARWAR
Which Now I am Changing as New Name MOHAMMAD RASHEED
Father name GULAM SARWAR
Address is dargapura, Kandhar, Dist.Nanded, Maharashtra - 431714
Hence forth my all Correspondance will be done as per my new name & address Please consider the same.
Contact:9766557299

**CHANGE IN NAME**
My Old Name Is FARZANA BEGUM Spouse RASHEED.
Which Now I am Changing as New Name FARZANA BEGUM
Spouse MOHAMMAD RASHEED
Address Is Dargapura kandhar, Dist.Nanded, Maharashtra - 431714
Hence forth my all Correspondance will be done as per my new name & address Please consider the same.
Contact:9766557299



सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२११९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# हदगाव शहराची लोकसंख्या ४० हजारांपेक्षा जास्त तरीही महिलांसाठी स्वच्छता गृहाचा अभाव

हदगाव/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील सर्वात जुन्या शहरांपैकी हदगांव शहर म्हणून ओळख असलेल्या शहरात मूलभूत सुविधांचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे. विशेषतः शहरातील जुने बसस्थानक, पोलीस स्टेशन परिसर तसेच पंचायत समिती व तहसील कार्यालयाच्या परिसरात महिलांसाठी सार्वजनिक प्रसाधनगृहांची सोय नसल्याने महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शहरात सुमारे ४० हजारांहून अधिक लोकसंख्या असलेल्या या शहरात दररोज विविध कामानिमित्त येणाऱ्या महिलांना प्रसाधनगृहांच्या अभावामुळे कुचंबना सहन करावी लागते. शहरासह ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांसाठी ही समस्या अधिकच गंभीर बनली आहे. विशेषतः शुक्रवारी असलेल्या आठवडी बाजाराच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर महिलांची गर्दी होत असताना प्रसाधनगृहांच्या अभावामुळे अनेक महिलांना अनोळखी घरांचा आधार घ्यावा लागतो, ही बाब शहराच्या प्रतिमेला धक्का देणारी ठरत आहे. विशेष म्हणजे, नगरपालिकेत १० महिला नगरसेविका आणि महिला नगराध्यक्षा निवडून आल्या असतानाही ह्या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याच दिसून येत आहे महिलांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होत असल्याने महिला नगरसेविकांनी या विषयावर आक्रमक भूमिका घेण्याची गरज व्यक्त होत आहे. दरम्यान, शहरातील पुरुषांसाठी असलेली प्रसाधनगृहे ही अत्यंत दयनीय अवस्थेत असून स्वच्छतेचा पूर्ण अभाव दिसून येतो. स्वच्छता ही केवळ घोषणांपुरती मर्यादित राहिली आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.हदगाव नगरपालिकेने शहरातील प्रमुख ठिकाणी नियोजनबद्ध पद्धतीने स्वच्छ, सुरक्षित व सुसज्ज महिला व पुरुष प्रसाधनगृहे उभारावीत, अशी मागणी आता जोर धरत असून प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

## रेती वाहतूक करणारा हायवा पकडला

नांदेड/प्रतिनिधी-अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा बुधवारी दुपारी शहरातील हातोडा चौकात विमानतळ पोलीसांनी पकडला आहे. हातोडा चौकातून विना क्रमांकाचा हायवा रेती घेवून जात असतांना गस्तीवरील विमानतळ पोलीसांना आढळून आला. पोलीसांनी सदरील हायवाची तपासणी केली असता त्यामध्ये पाच ब्रास रेतीचा साठा होता. पोलीसांनी हायवा व रेती जप्त केली आहे. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात मोतीराम बालाजी अवरगंड रा.खांबेगाव ता.पूर्णा व सचिन चव्हाण रा.तळणी यांना अटक केली.

# देगलूर नगरपरिषदेत शहिद सचिन वनंजे यांना अभिवादन




देगलूर/प्रतिनिधी-देगलूर भुमिचे सुपुत्र ऑपरेशन सिंदूर मध्ये देशसेवेत कर्तव्य बजावत असताना वीरमरण आलेले शहिद जवान सचिन यादवराव वनंजे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनाचे देगलूर नगरपरिषदेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

देगलूर तालुक्यातील भुमिपूत्र शहिद जवान सचिन यादवराव वनंजे यांचे मागील वर्षी ''ऑपरेशन सिंदूर'' युध्दात देशसेवेत कर्तव्य बजावत असताना जमूकश्मिर येथे त्यांना वीरमरण आले होते. दि.६ मे बुधवार रोजी सकाळी देगलूर नगरपरिषदेच्या सभागृहात प्रथम पुण्यस्मरण दिना निमित्ताने शहिद जवानांचे स्मरण व अभिवादन कार्यक्रम आयोजित करून शहिद जवान सचिन वनंजे यांच्या प्रतिमेला त्यांचे आई-वडिल कलावती यादवराव वनंजे, नगराध्यक्षा प्र.बालाजी टेकाळे, उपनगराध्यक्ष ॲड.अंकुश देसाई, लक्ष्मीकांत पदमवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी मा.नगराध्यक्ष विवेक केरूरकर, सुमंत कांबळे, एकनाथ टेकाळे, अनिल बोन्लावार, नंदूशेट शाखावार, चंद्रकांत मोरे, द्याडे, देवेंद्र मोतेवार, दिगंबर कौरवार व्यंकट कांबळे, दिगंबर कडलवार, धोंडिबाजी कांबळे, रमेश सोनकांबळे, सय्यद मोहियोद्दीन, पाशाभाई बाटको, सुशिलकुमार देगलूरकर, पें.संजय कांबळे, सतिश पांडवे, पो.उपनिरिक्षक महाजन मैसनवाड, सचिन कांबळे, सुमित कांबळे, यादव फिंरगे, गजुभाऊ कांबळे, संतोष उनग्रतवार यांच्यासह सर्व नगरसेवक शहीद सचिन वनंजे यांचे कुंटुबीय नगरपरिषदचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक व विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नसरापूर अत्याचार प्रकरणाच्या निषेधार्थ माहूरमध्ये निषेध मोर्चा

माहूर/प्रतिनिधी-पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे अल्पवयीन चिमुकलीवर झालेल्या अमानुष अत्याचाराच्या घटनेने संपूर्ण राज्य हादरले असून, या घटनेचे तीव्र पडसाद दि.६ रोजी माहूरमध्ये उमटले. नराधमाला मृत्युदंडच झाला पाहिजे या एकमुखी मागणीसाठी महिला व नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येत तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला.

हातात निषेधाचे फलक, बॅनर आणि आरोपीविरुद्ध तीव्र संताप व्यक्त करत निघालेल्या या मोर्चाने शहर दणाणून सोडले. आरोपीला फाशी द्या!, पीडितेला न्याय मिळालाच पाहिजे! अशा जोरदार घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. प्रत्येक घोषणेतून नागरिकांच्या मनातील वेदना आणि संतापाची तीव्रता स्पष्टपणे जाणवत होती.मोर्चाच्या शेवटी आंदोलकांनी तहसीलदार यांना निवेदन सादर केले. या प्रकरणाची जलदगती न्यायालयात (फास्ट ट्रॅक कोर्ट) सुनावणी करून दोषी आरोपीला तात्काळ कठोरात कठोर शिक्षामृत्युदंड देण्यात यावा, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. तसेच पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने प्रभावी पावले उचलावीत, अशीही मागणी आंदोलकांनी केली.

CHANGE IN NAME

My (old name) is **BAGMARE MOHAMMAD KHALED** which now I am, changing as (new name) **SHAIKH MOHAMMAD KHALED SHAIKH MOHAMMAD JAFER**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Address
2/7/72, Khadakpura Nanded- 431601
M No-8087901217

CHANGE IN NAME

My (old name) is **MAHAMAD ESAKHAHMAD M NIJAMODDIN** which now I am, changing as (new name) **MOHAMMED ISHAQUE AHMED MOHAMMED NIZAMUDDIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MOHAMMED ISHAQUE AHMED MOHAMMED NIZAMUDDIN**
R/o 45-2, Pandri galli, post Karkheli
Tq.Dharmabad Dist. Nanded-431808
M.No.-8055737686

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नांदेड
प्रशासकीय इमारत हिंगोली गेट जवळ,चिखलवाडी,
नांदेड. पिन-४३१६०१
जा.क्र.२०२५/मृत्यु प्रमाणपत्र/सिआर-२२३/२०२५ दिनांक २७/०३/२०२६

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार शेख खाजामियाँ शेख शादुल्ला वय ४३ रा.नेरली ता.जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचे आईचे मृत्यु प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

मृत्यू झालेल्यांचे नाव जेजुबी शादुल्ला शेख रा.नेरली ता.जि.नांदेड सदर व्यक्तीचा राहते घर नेरली ता.जि.नांदेड या ठिकाणी दिनांक १४.०५.२०१४ या दिवशी मृत्यु झाला असून मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक २६.०२.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झालेपासून (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक-२७/०३/२०२६
स्थळ-नांदेड
स्वाक्षरित/-
तहसिलदार नांदेड

# पतीस विद्युत प्रवाहाचा शॉक देऊन ठार करणाऱ्या पत्नीस जन्मठेपेची शिक्षा

भोकर/प्रतिनिधी-तू दुसऱ्या लोकाला का बोलती म्हणून पत्नीवर आरोप घेणाऱ्या पतीस विद्युत प्रवाहाने शॉक देऊन ठार करणाऱ्या पत्नीस भोकर व जिल्हा सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली ५ हजार रुपयाचा दंड व सश्रम कारावास देखील ६ मे २०२६ रोजी सुनावण्यात आला आहे.

उमरी तालुक्यातील मौजे तळेगाव येथील मयत भीमराव नागोजी हैबते वय ४० वर्ष हा आपली पत्नी आम्रपाली हैबते वय २९ वर्ष हीच्यावर नेहमी दारू पिऊन तू दुसऱ्या लोकांसोबत का बोलतेस म्हणून संशय घेत होता. १५ जून २०१९ रोजी रात्री १२:३० वा.मयत भीमराव हैबते हा झोपलेला असताना पत्नी आम्रपाली हिने चालू विद्युत वायरच्या शॉक देऊन त्यास ठार केले. नातेवाईकांनी विचारपूस केली असता हार्ट अटॅक आला असे सांगितले. बनीयान त्यांच्या बेंबीच्या खाली पॅनटात खोचून ठेवली होती आणि शॉक दिलेला वायर जसाच्या तसा जोडून ठेवला होता. या संशयावरून धारजणी ता.भोकर येथील येथील मयताची बहीण जयशीला गौतम चव्हाण हिने उंमरी पोलिसात फिर्याद दिली मयताची पॅन्ट जळालेली होती ती बदलून दुसरी पॅन्ट घातलेली होती बेंबीच्या खाली काळे डाग व जखम झालेली होती जॉईंट केलेले वायर सुद्धा दिसून आले. लाकडी दांड्याला वायर बांधलेले होते ते कपड्यात गुंडाळून ठेवण्यात आले होते. अशा सर्व बाबीवरून माझा भाऊ भीमराव यास त्याची पत्नी आम्रपाली हिने विद्युत वायरचा शॉक देऊन ठार केल्याचा संशय असल्याची फिर्याद दिल्याने १६ जून २०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक उत्तम मुंडे यांनी तपास करून दोषारोप पत्र भोकर न्यायालयात दाखल झाल्याने सदर प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने नऊ साक्षीदार तपासून आरोपीचा मुलगा निलेश भीमराव हैबते वय १३ वर्ष यांनी साक्ष देताना असे सांगितले की, घटनेच्या वेळी कमरे जवळ जळालेली पॅन्ट व शर्ट आईने काढून बाजे खाली ठेवली होती व बाबानी दारू पिताना हीच पॅन्ट शर्ट घातले होती. मुलाची साक्ष महत्त्वाची धरून अतिरिक्त सरकारी अभियोक्ता सौ. अनुराधा शिवराज डावकरे यांनी समर्थपणे बाजू मांडली व आरोपीस कठोर शिक्षा देण्याची विनंती केली. भोकर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश मोहम्मद नासिर मोहम्मद सलीम यांनी सरकार पक्षाच्या वतीने प्रस्तुत केलेला पुरावा व उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे ग्राह्य धरून व मुलाची साक्ष ग्राह्य धरून आरोपी आम्रपाली हैबते हिस कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा व सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६
जा क्रं २०२६/जे.मृ.नो./कवी दिनांक ०७/०४/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार मोहम्मद युनुस मोहम्मद इस्माईल रा.सुलतानपुरा कंधार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या मोहम्मद युनुस मोहम्मद इस्माईल रा.सुलतानपुरा कंधार ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेंल्या चे नाव मोहम्मद युनुस मोहम्मद इस्माईल रा.सुलतानपुरा कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक २४/११/२००२ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ६/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६
जा क्रं २०२६/जे.मृ.नो./कवी दिनांक ०७/०४/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार वहाब सिदिक शेख रा गायकवाड गल्ली कंधार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या वहाब सिदिक शेख रा गायकवाड गल्ली कंधार ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेंल्या चे नाव वहाब सिदिक शेख रा गायकवाड गल्ली कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक २३/१२/२००२ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ६/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६
जा क्रं २०२६/जे.मृ.नो./कवी दिनांक २७/०४/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार गजानन माधव पवार रा.जाकापूर ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या गजानन माधव पवार रा. जाकापूर ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेंल्या चे नाव गजानन माधव पवार रा. जाकापूर ता. कंधार या ठिकाणी दिनांक २२/०९/२०१९ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १३/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**
Email Id:tahkadhar@gmail.com दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६
जा क्रं २०२६/जे.मृ.नो./कवी दिनांक ०७/०४/२०२६
**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार शेख जिशान शे. सिद्दिकी रा गायकवाड गल्ली कंधार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या शेख जिशान शे. सिदिकी रा गायकवाड गल्ली कंधार ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेंल्या चे नाव शेख जिशान शे. सिदिकी रा गायकवाड गल्ली कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक २२/०४/२००७ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ६/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**नगर परिषद कार्यालय हदगाव**

जा.क्र.५६४/२०२६
कार्यालय नगर परिषद हदगाव
दि.५/५/२०२६

सर्व जनतेस ह्या जाहीर प्रगटनद्वारे कळविण्यात येते कि, हदगाव न.प.हद्दीतील शेत सर्व्हे नंबर -- मधील प्लॉट क्र.-- वार्ड क्र.०१ मालमत्ता क्र.७७२ मोकळी जागा श्री १) ऋषिकेश रामर वटमवार, २) गजानन शिवशंकर बियाणी, ३) मारोती रुकाराम हुलकाने, ४) राजेश्वर रामचंद्र रायेवार, ५) रीकेंश राजेश्वर रायेवार, ६) रितेश राजेश्वर रायेवार यांचे नावे असलेली खरेदी खत दस्त क्रमांक (क्र.३५६६/२०२४) आधारे श्रीमती शोभा गणेशराव कोटूरवार यांचे नावे करण्यात येत आहे.

**ज्याची चतुःसीमा खालील प्रमाणे आहे**
पूर्वस :- प्लॉट क्रमांक ०३ व ०४ ची जागा
पश्चिमेस :- ६.१० मीटर रंदीचा अंतर्गत रस्ता
दक्षिण :- प्लॉट क्रमांक ०२ ची जागा
उत्तर :- प्लॉट क्रमांक १० ची जागा

**वरील चतुः सीमेच्या आतील प्लॉटची जागा**

अर्जदार श्रीमती शोभा गणेशराव कोटूरवार यांच्या नावे करणे बाबत या कार्यालयात अर्ज दिला आहे. या बाबत कोणास आक्षेप असल्यास प्रसिद्धी दिनांका पासून (१५) दिवसाचे आत या कार्यालयास लेखी पुराव्यासह दाखल करावे. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व सदर जागेची नोंद रीतसर अर्जदाराच्या नावे न.प.च्या मालमत्ता रजिस्टरला घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर परिषद हदगाव

**नगर परिषद कार्यालय हदगाव**

जा.क्र.५६५/२०२६
कार्यालय नगर परिषद हदगाव
दि.५/५/२०२६

सर्व जनतेस ह्या जाहीर प्रगटनद्वारे कळविण्यात येते कि, हदगाव न.प.हद्दीतील शेत सर्व्हे नंबर २२/२/२ मधील प्लॉट क्र.०२ वार्ड क्र.-- मालमत्ता क्र.-- मोकळी जागा श्री चंद्रशेखर सातप्पा होकर्णे, २) निलेश राजेंद्र गोरटे, ३) रितेश राजेश्वर रायेवार यांचे नावे असलेली खरेदी खत दस्त क्रमांक (क्र.२२०६/२०२४) आधारे १) श्री राम माधव वट्टमवार, २) शोभा गणेशराव कोटूवार यांचे नावे करण्यात येत आहे.

**ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे**
पूर्वस :- हदगाव नागपूर रोड
पश्चिमेस :- प्लॉट क्रमांक ०५ व ०६ ची जागा
दक्षिण :- प्लॉट क्रमांक ०१ ची जागा
उत्तर :- प्लॉट क्रमांक ०३ ची जागा

**वरील चतुः सीमेच्या आतील प्लॉटची जागा**

अर्जदार १) श्री राम माधव वट्टमवार, २) शोभा गणेशराव कोटूवार यांच्या नावे करणे बाबत या कार्यालयात अर्ज दिला आहे. या बाबत कोणास आक्षेप असल्यास प्रसिद्धी दिनांका पासून (१५) दिवसाचे आत या कार्यालयास लेखी पुराव्यासह दाखल करावे. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व सदर जागेची नोंद रीतसर अर्जदाराच्या नावे न.प.च्या मालमत्ता रजिस्टरला घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर परिषद हदगाव

**नगर परिषद कार्यालय हदगाव**

जा.क्र.५६६/२०२६
कार्यालय नगर परिषद हदगाव
दि.५/५/२०२६

सर्व जनतेस ह्या जाहीर प्रगटनद्वारे कळविण्यात येते कि, हदगाव न.प.हद्दीतील शेत सर्व्हे नंबर -- मधील प्लॉट क्र.-- वार्ड क्र.०१ मालमत्ता क्र.७६० मोकळी जागा श्री १) ऋषिकेश रामर वटमवार, २) गजानन शिवशंकर बियाणी, ३) मारोती रुकाराम हुलकाने, ४) राजेश्वर रामचंद्र रायेवार, ५) रीकेंश राजेश्वर रायेवार, ६) रितेश राजेश्वर रायेवार यांचे नावे असलेली खरेदी खत दस्त क्रमांक (क्र.३५६७/२०२४) आधारे श्रीमती राम माधव वट्टमवार यांचे नावे करण्यात येत आहे.

**ज्याची चतुःसीमा खालील प्रमाणे आहे**
पूर्वस :- सरकारी रस्ता
पश्चिमेस :- प्लॉट क्रमांक ११ ची जागा
दक्षिण :- प्लॉट क्रमांक ०३ ची जागा
उत्तर :- प्लॉट क्रमांक ०५ ची जागा

**वरील चतुः सीमेच्या आतील प्लॉटची जागा**

अर्जदार श्री राम माधव वट्टमवार यांच्या नावे करणे बाबत या कार्यालयात अर्ज दिला आहे. या बाबत कोणास आक्षेप असल्यास प्रसिद्धी दिनांका पासून (१५) दिवसाचे आत या कार्यालयास लेखी पुराव्यासह दाखल करावे. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व सदर जागेची नोंद रीतसर अर्जदाराच्या नावे न.प.च्या मालमत्ता रजिस्टरला घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर परिषद हदगाव

**नगर परिषद कार्यालय हदगाव**

जा.क्र.५६७/२०२६
कार्यालय नगर परिषद हदगाव
दि.५/५/२०२६

सर्व जनतेस ह्या जाहीर प्रगटनद्वारे कळविण्यात येते कि, हदगाव न.प.हद्दीतील शेत सर्व्हे नंबर -- मधील प्लॉट क्र.-- वार्ड क्र.०१ मालमत्ता क्र.७७१ मोकळी जागा श्री १) ऋषिकेश रामर वटमवार, २) गजानन शिवशंकर बियाणी, ३) मारोती रुकाराम हुलकाने, ४) राजेश्वर रामचंद्र रायेवार, ५) रीकेंश राजेश्वर रायेवार, ६) रितेश राजेश्वर रायेवार यांचे नावे असलेली खरेदी खत दस्त क्रमांक (क्र.३५६५/२०२४) आधारे श्रीमती शोभा गणेशराव कोटूरवार यांचे नावे करण्यात येत आहे.

**ज्याची चतुःसीमा खालील प्रमाणे आहे**
पूर्वस :- प्लॉट क्रमांक ०५ व ०६ ची जागा
पश्चिमेस :- ६.१० मीटर रुंदीचा अंतर्गत रस्ता
दक्षिण :- प्लॉट क्रमांक ११ ची जागा
उत्तर :- प्लॉट क्रमांक ०९ ची जागा

**वरील चतुः सीमेच्या आतील प्लॉटची जागा**

अर्जदार श्रीमती शोभा गणेशराव कोटुरवार यांच्या नावे करणे बाबत या कार्यालयात अर्ज दिला आहे. या बाबत कोणास आक्षेप असल्यास प्रसिद्धी दिनांका पासून (१५) दिवसाचे आत या कार्यालयास लेखी पुराव्यासह दाखल करावे. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व सदर जागेची नोंद रीतसर अर्जदाराच्या नावे न.प.च्या मालमत्ता रजिस्टरला घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर परिषद हदगाव

# माजी प्राचार्य जयवंत येवतीकर अनंतात विलिन

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटी संचालित पीपल्स महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य जयवंत येवतीकर यांचे मंगळवारी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८६ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर आज गुरुवारी सकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



सोमवारी हृदयविकाराचा त्रास जाणवल्याने त्यांना डॉ.काब्दे यांच्या नारायणा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या पीपल्स महाविद्यालयात सुरुवातीच्या काळात त्यांनी प्राध्यापक म्हणून कार्य सुरू केले. पुढे प्राचार्य पदापर्यंत त्यांनी उल्लेखनीय सेवा बजावली. नांदेड येथे नव्याने सुरू झालेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रारंभीच्या शैक्षणिक कार्यकाळात तत्कालीन कुलगुरू जनार्दन वाघमारे यांनी त्यांच्यावर परीक्षा विभागाची जबाबदारी सोपविली होती. त्यांच्या निधनामुळे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच माजी खा.डॉ. व्यंकटेश काब्दे, ॲड. प्रदीप नागापूरकर यांनी येवतीकर परिवाराची भेट घेतली. शांतीधाम येथे झालेल्या शोकसभेत नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील, चिरंजीलाल दागडिया, स. नौनिहालसिंघ जहागिरदार, पीपल्सचे प्राचार्य डॉ. एस.जी. भानेगावकर, रवी श्यामराज, प्रा.रोडे, प्रा.वाकोडे, माजी प्राचार्य आर.एम.जाधव आदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी नांएसोच्या सचिव प्रा. श्यामल पत्की, दीपनाथ पत्की, अरुण जाधव, डी.बी.देशपांडे, प्रा.तुळापूरकर, प्रा.अनंत राऊत यांच्यासह शैक्षणिक क्षेत्रातील मान्यंवर उपस्थित होते.

# देगलूर तालुक्यातील सेतू केंद्र बनले लुटीचे केंद्र?

देगलूर/प्रतिनिधी-दहावी-बारावी निकालानंतर विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची गरज वाढताच सेतू सुविधा केंद्रांपासून ते तहसील कार्यालयातील टेबलांपर्यंत दर ठरवून लूट चालवली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तहसील प्रशासन मात्र बघ्याची तथा मौनी भूमिका निभावत असल्याने नागरिकांतून नाराजी व्यक्त केली जात आहे.




देगलूर तहसील कार्यालय सध्या सर्वसामान्यांसाठी सेवा केंद्र राहिले नसून लुटीचे केंद्र बनल्याची तीव्र टीका नागरिकांकडून होत आहे. तालुक्यातील सर्वाधिक जास्त लोणी या गावासह मरखेल, हाणेगाव, करडखेड व शहरातील सर्व सेतू सुविधा केंद्रांवर विद्यार्थ्यांना लागणाऱ्या उत्पन्न, रहिवासी, नॉन-क्रीमीलेयर अशा अत्यावश्यक कागदपत्रांसाठी शासनाने निश्चित केलेले दर केवळ फलकावरच राहिले आहे. प्रत्यक्षात मात्र प्रत्येक कागदपत्रासाठी दुप्पट-तिप्पट रक्कम वसूल केली जात आहे. काम त्वरित हवे असेल तर जास्त पैसे मोजा अशी एकेरी भाषा तहसील कार्यालयातील संबंधित टेबल धारकाचा नायब तहसीलदार व त्याचा कोतवाल वापरली जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. विशेष म्हणजेया लुटीत केवळ सेतू केंद्र चालकच नाहीत तर तहसील कार्यालयातील काही टेबलधारकांचाही सहभाग असल्याचे आरोप केला जात आहे. प्रत्येक प्रमाणपत्रासाठी १०० ते १५० रुपये साइडने घेतल्याशिवाय फाईल पुढे सरकत नाही अशी विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित कागदपत्रे मिळवण्यासाठी पालकांना अक्षरशः पैशांचा वर्षाव करावा लागत आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण प्रकार दिवसाढवळ्या सुरू असतानाही तहसील प्रशासनाने अद्याप एकही कारवाई केलेली नाही. यामुळे ही लूट प्रशासनाच्या मूक संमतीनेच सुरू आहे का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषी सेतू सुविधा केंद्र चालकाचा परवाना रद्द करून त्यांना अभय देणाऱ्या वर कठोर कारवाई करण्यात यावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते श्रीराम पाटील येडुरकर यांच्यासह अनेक पालक व नागरिकांनी दिला आहे.

### तहसीलदारांना प्रश्न विचारला तर उत्तरात टोलवा-टोलवी...!

काही जागरूक नागरिकांनी तहसीलदार भरत सूर्यवंशी यांची भेट घेऊन या प्रकाराची माहिती दिली. मात्र केलेल्या आरोपांवर कारवाईची ग्वाही देण्याऐवजी साईट बंद आहे, तुमचे काम होईल अशी उडवाउडवीची उत्तरे देत नागरिकांना परत पाठवण्यात आले. या प्रतिसादामुळे तहसीलदारांच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासनातील जबाबदार अधिकारीच जर मौन बाळगत असतील तर या लुटीला आळा कोण घालणार?, असा सवाल उपस्थित होत आहे.

# माविकसंच्या परिमंडळ अध्यक्षपदी शंकर घुले तर सचिवपदी रामेश्वर कौठेकर

नांदेड/प्रतिनिधी-मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या नांदेड परिमंडळ अध्यक्षपदी शंकर घुले तर सचिवपदी रामेश्वर कौठेकर यांची निवड करण्यात आली आहे.

मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. संजय घोडके यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेच्या सदस्यांची महत्वपूर्ण बैठक सहयोगनगर येथील बौद्ध विहाराच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संघटनेच्या नांदेड परिमंडळ अध्यक्षपदी शंकर घुले यांची





फेरनिवड करण्यात आली असून तसेच कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे.

रामेश्वर कौठेकर (सचिव), अविनाश खंदारे, विनय शहाणे (उपाध्यक्ष), भीमराव सोनकांबळे, संदेश खंदारे, सिद्धार्थ पिंपरे (सहसचिव), एस.एम. कांबळे, वैभव सोनसळे (संघटक), सिद्धार्थ पाटील, प्रमोद बुक्कावार, राजकुमार सिंदगीकर (मुख्य सल्लागार), विनोद बिंगेवार, राजेश भागवत (प्रसिद्धी प्रमुख), रेखा लोणे, पल्लवी कदम, संघविना ढवळे (महिला प्रतिनिधी), आर.डी. पवार, धम्मपाल वाकळे, राजीव कांबळे यांची सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. या बैठकीला केंद्रीय उपाध्यक्ष विनायकराव ढवळे, सिध्दार्थ पाटील, अभयराज कदम, सिद्धार्थ कांबळे, निझान तिमके, सचिन शिंदे, सोहेल खान, दशरथ पवार यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# राजकीय सूडातून मतदार यादीतून नाव गायब-ज्योतीबा खराटे

माहूर/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीपूर्वीच राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख ज्योतीबा खराटे यांनी सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोपांची सरबत्ती केली आहे. निवडणूक लढवू नये म्हणूनच नियोजनबद्ध कट रचत माझे नाव मतदार यादीतून वगळण्यात आले, असा थेट आरोप करत त्यांनी प्रशासन आणि राजकीय हस्तक्षेपावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

खराटे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की,अंजनखेड येथील सेवा सहकारी सोसायटीचा ठराव नियमानुसार ४ एप्रिल रोजी



मंजूर करण्यात आला होता. संबंधित संस्थेवर कोणतीही थकबाकी नसल्याचे अधिकृत प्रमाणपत्रही उपलब्ध असताना आपले नाव मतदार यादीतून वगळणे हा केवळ तांत्रिक प्रकार नसून राजकीय सूडबुद्धीचा भाग असल्याचा दावा त्यांनी केला. माझा वाढता जनाधार आणि निवडणुकीतील प्रभाव लक्षात घेऊन विरोधक घाबरले आहेत. त्यामुळेच मला निवडणूक प्रक्रियेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा आरोप करत खराटे यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार निशाणा साधला. यापूर्वीही जिल्हा परिषद निवडणुकीत अंजनखेड गावाचा गट बदलून राजकीय अडथळे निर्माण करण्यात आल्याचा आरोप त्यांनी पुन्हा केला. सत्तेचा वापर करून विरोधकांना संपविण्याची मानसिकता लोकशाहीसाठी घातक आहे, असेही ते म्हणाले.जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मतदार यादीत अनेक नावे संशयास्पद असल्याचा दावा करत त्यांनी लवकरच अधिकृत आक्षेप नोंदविणार असल्याचे स्पष्ट केले. प्रशासनाने निष्पक्ष भूमिका घेतली नाही, तर न्यायालयाचे दरवाजे ठोठावले जातील, असा इशाराही त्यांनी दिला. खराटे यांच्या आक्रमक भूमिकेमुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक आता केवळ सहकार क्षेत्रापुरती मर्यादित न राहता ती राजकीय प्रतिष्ठेची लढाई बनण्याची चिन्हे दिसत आहेत. निवडणुकीपूर्वीच आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्याने जिल्ह्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# माहूरमध्ये जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

माहूर/प्रतिनिधी-माहूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत जुगार खेळत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ कारवाई करत एका जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत रोख रक्कम व मोबाईल असा एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला असून प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.५ मे २०२६ रोजी रात्री सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास रामनगर परिसरातील शेतजमिनीत काही जण जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने छापा टाकून आरोपींना रंगेहाथ पकडले. या कारवाईत सुमारे ९ हजार ४३० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. आरोपींमध्ये आकाश रमेश राठोड (वय ३२, रा. रामपूर) याच्यासह सुमित पवार, शंकर राठोड, दिनेश पवार, मोहन राठोड, चेतन हून्ना जाधव, वाजीत खान सुफियान अकबानी रा.वाई बाजार यांचा समावेश असून पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनात पुढील सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके हे करीत आहे.




हज यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरुंचा एमआयएमच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी महापालिकेचे विरोधी पक्षनेते मसूद अहेमद खान, फेरोज लाला, गटनेते सय्यद मुजीब स.मुख्तार, नगरसेवक सय्यद फसीयोद्दीन, अब्दुल हबीब बागवान, मो.नासेरखान, मो.अनवर खान, मो.अल्ताफ हुसेन, चाँदपाशा कुरेशी, रहीमखान यांच्यासह पक्षाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

जा.क्र.कं.न.प./प्रशा/११००/२०२६

# कंधार नगर परिषद,कंधार

## जाहीर निविदा सूचना

## (द्वितीय वेळ)

कंधार नगरपरिषद कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचेकडून कंधार नगरपरिषदेचे काम कंधार नगरपरिषदेमधील कर विभागाकरीता (IWBP) आय.डब्लू.बी.पी. (इंटिग्रेटेड वेब बेस्ड पोर्टल) मध्ये सर्व मालमत्ताधारक व पाणीपट्टी धारक यांची सर्व माहिती दुरुस्ती करणे तसेच उर्वरित नव्याने स्वहस्ते डाटा एन्ट्री करणे यासाठी योग्य त्या निविदा धारकांकडून द्विलीफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील व वेळापत्रक नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. निविदा सादर करण्याचा कालावधी दि.:- ०७/०५/२०२६ ते दि.१३/०५/२०२६ सायं.०५.०० वा. पर्यंत आहे.

स्वाक्षरित/-
(श्री.संदिप भोळे)
मुख्याधिकारी,
कंधार नगरपरिषद कंधार

दि.०६/०५/२०२६

पान १ वरुन

### बिहार मंत्रिमंडळाचा...

पहिलेच मंत्रीपद असल्याने राजकीय वर्तुळात त्याची मोठी चर्चा सुरू आहे. दरम्यान, बिहारचे दोन वेळा आरोग्यमंत्री राहिलेले भाजपचे ज्येष्ठ नेते मंगल पांडे यांना यावेळी मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही. त्यांना भाजप संघटनेत महत्त्वाची जबाबदारी दिली जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यांची भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीसपदी नियुक्ती होऊ शकते तसेच उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीची जबाबदारीही त्यांच्याकडे सोपवली जाऊ शकते, अशी चर्चा आहे.भाजपच्या कोट्यातील १५ मंत्र्यांपैकी पाच नवीन चेहरे मंत्रिमंडळात दाखल झाले असून तीन माजी मंत्र्यांना यावेळी संधी मिळालेली नाही. यामध्ये मंगल पांडे, सुरेंद्र मेहता आणि नारायण प्रसाद यांचा समावेश आहे. यापूर्वी नव्या विस्तारानंतर सम्राट सरकारमधील मंत्र्यांची संख्या मुख्यमंत्र्यासह ३५ वर पोहोचली आहे. जातीय समीकरण लक्षात घेऊन मंत्रिमंडळाची रचना करण्यात आल्याचे दिसून येत असून त्यामध्ये ९ ओबीसी, ९ ईबीसी, ९ सर्वसाधारण प्रवर्ग, ७ दलित आणि १ मुस्लिम मंत्र्यांचा समावेश आहे. मंत्रिमंडळात पाच महिला मंत्र्यांनाही स्थान देण्यात आले आहे.

### वादळाच्या तडाख्यात...

पाहायला मिळाले. मागील तीन दिवसांपासून माहूर तालुक्यात वातावरणात बदल जाणवत होता. गुरुवारी दुपारी सुमारे साडेबारा वाजण्याच्या सुमारास अचानक काळे ढग दाटून आले आणि वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस सुरू झाला. जवळपास दीड तास सुरू असलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी नागरिकांची गैरसोय झाली. काही भागांत होर्डिंग्ज, बॅनर आणि तात्पुरती उभारलेली साहित्ये कोसळल्याच्या घटनाही घडल्या.लखमापूर येथे सुरू असलेल्या विवाह सोहळ्यात अचानक आलेल्या वाऱ्यामुळे मंडपाचा काही भाग उखडून उडाला. त्यामुळे उपस्थित वऱ्हाडी व नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, लग्न समारंभात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. ऐन उन्हाळ्यात झालेल्या या अवकाळी पावसामुळे उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी शेतकरी वर्गात मात्र चिंता व्यक्त होत आहे.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या...

दृश्यमानतेमुळे हेलिकॉप्टरवर नियंत्रण ठेवणे कठीण झाले होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वैमानिकाने तातडीने तांत्रिक कौशल्याचा वापर करत हेलिकॉप्टर सुरक्षित क्षेत्राकडे वळवले. त्यानंतर हेलिकॉप्टर जुहू विमानतळाच्या दिशेने नेण्यात आले आणि तेथे यशस्वीपणे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले.या हेलिकॉप्टरमध्ये उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यासह एकूण आठ जण प्रवास करत होते. यामध्ये स्वीय सहाय्यक प्रभाकर काळे, मुख्य जनसंपर्क अधिकारी विनायक पात्रूडकर, ओएसडी राजपूत, मुख्य सुरक्षा अधिकारी तसेच अन्य कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या सर्वांचा थोडक्यात बचाव झाला असून वैमानिकाच्या समयसूचकतेमुळे मोठा अनर्थ टळल्याची चर्चा आहे. काही दिवसांपूर्वी राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाती निधनानंतर राज्यातील नेत्यांमध्ये हवाई प्रवासाबाबत सावधगिरी वाढली आहे. अशातच शिंदे यांच्या हेलिकॉप्टरशी संबंधित ही घटना समोर आल्याने राजकीय वर्तुळात पुन्हा खळबळ उडाली आहे.

### माजी जिल्हाधिकाऱ्यांना...

त्यांनी बीड जिल्ह्यात विविध महत्त्वाच्या पदांवर दीर्घकाळ काम केले आहे. उपजिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, पुरवठा अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रशासकीय मंडळाचे सदस्य अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या होत्या. त्यानंतर त्यांची बीड जिल्हाधिकाऱ्यपदी नियुक्ती झाली होती. गेल्या वर्षी त्यांची बदली लातूर येथे करण्यात आली होती.दरम्यान, या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, बनावट कागदपत्रांची साखळी आणि संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका यांचा आता सखोल तपास सुरू असून, आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### आजार एकाकीपणाचा...

हरिप्रसाद सारडा, डॉ. राजेंद्र मुंदडा, रामप्रसाद मुंदडा (हदगाव), रमेश डागा, जगदीश बियाणी (मुखेड), ॲड. चिरंजीलाल दागडिया, संतोष माणियार, कैलाश बाहेती, सीए गोविंदप्रसाद मुंदडा आणि सीए सागर बाहेती यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४